Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# दलित साहित्यातील वेदना : एक आकलन

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर, जि. लातूर

**वेदना :**

दलित साहित्य हे वेदनेचे साहित्य आहे. आपल्या वाट्याला आलेल्या युगानुयुगाची चिरवेदना दलित साहित्यिक साहित्यातून व्यक्त करतात. येथील विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेने माणसाचे माणूसपण तर दडपून ठेवलेच पण राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांचे शोषण करणारी व्यवस्था निर्माण केली.ही व्यवस्था निर्माण करण्यास या देशातील हिंदू धर्माची शिकवण कारणीभूत आहे. अस्पृश्यांना माणुसकीने जगण्याचे हक्क नाकारणारे कायदे धर्मग्रंथात लिहून ठेवले गेले. चातुर्वर्णीय समाजव्यवस्थेत अस्पृश्यांना अत्यंत अपमानास्पद जीवन जगण्यास भाग पाडणारा 'मनुस्मृती' हा ग्रंथ समाजासमोर आदर्श म्हणून व कायद्याचा ग्रंथ म्हणून प्रमाण मानला गेला. ह्या ग्रंथातील अत्यंत अमानुष, जाचक व माणुसकी कुंठित करणारा विचार दलितांच्या जीवनात दु:ख निर्माण करणारा ठरला. या दलितांच्या जीवनातील वेदनेचे चित्रण करताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात, शुद्रांना ज्ञान व मान देऊ नये, त्यांच्या धनाचा अपहार निर्धन व ब्राह्मणांनी, द्विजांनी यज्ञप्रसंगी किंवा दुष्काळात खुशाल करावा. शुद्रांनी आपत्काली वरच्या वर्णाचे उद्योग-धंदे केल्यास त्यांना कठीण व क्लेशकारक देहदंड द्यावा. शूद्र वर्णाने उच्चवर्णीयांची निर्भत्सना केल्यास अगर शिवीगाळ केल्यास त्याची जिव्हा छेदावी; पण उच्च वर्णाने तसे केल्यास नुसती समज देऊन सोडावे. ब्राह्मण जातीच्या इसमाला कोणत्याही महा अपराधातसुद्धा देहदंडाची शिक्षा करू नये. शुद्राने मुद्दाम वेद ऐकल्यास शिशाचा तप्त रस त्याच्या कानात ओतून त्यास ठार करावे, त्याने वेद पाठ केल्यास करवतीने चिरावे[१] अशा प्रकारचे अत्यंत भयावह जीवन दलितांना जगावे लागले. या मरणप्राय यातना देणारे शेकडो कायदे गौतम, मनू, याज्ञवल्क्य, नारद, ब्रहस्पती, कात्यायन यांसारख्या स्मृतीकारांनी धर्मग्रंथात सांगितले आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दलितांच्या छळांचे केलेले चित्रण वाचले की मन अस्वस्थ होते. या अत्यंत जाचक नियमांमध्ये दलितांचे जीवन होरपळून निघाले होते. या होरपळलेपणाचा अनुभव व्यक्त करताना बाबुराव बागूल लिहितात, या दुर्दैवी देशात माणसाने दलित जातीत जन्म घेऊ नये घेतल्यास असे दु:ख, असा अपमान सहन करावा लागतो की, त्यातून मरण बरे वाटते. विष प्यारे होते अंत:करणातील अमृत सडून जाते अन् उरते फक्त तलवारीपेक्षाही क्रूर, कठोर चीड[२] ही वेदना जगणे असहाय करणारी आहे. या देशातील वर्णव्यवस्थेने व अस्पृश्यतेने येथील दलित माणसाचे जगणेच उद्ध्वस्त केले. हजारो वर्षांपासून या अत्याचाराच्या नियमांमुळे दलितांच्या कित्येक पिढ्या बरबाद झाल्या. ही दलितांची वेदना शारीरिक रोगामुळे किंवा नैसर्गिक अपघातांमुळे निर्माण झाली नाही, तर ती येथील विषमताधीष्ठित समाजव्यवस्थेमुळे निर्माण झाली आहे. माणसा-माणसात विषमता राखणाऱ्या विविध धर्मग्रंथामधून समाजातील काही घटकांना विशेष संधी दिल्या तर काही घटकांना त्या संधी डावलल्या. ही गुलामगिरी ईश्वरनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे. दलितांवरील अन्याय, अत्याचार अनंत प्रकारचे होते. या भीषण अत्याचाराचे वर्णन वामन निंबाळकर यांनी अत्यंत

जिवंतपणे केले आहे. त्याला जे जीवन हजारो वर्षे जगावे लागले ते इतके भयंकर, छळयुक्त तितकेच घृणास्पद आहे. अज्ञान, दारिद्र्य ,लाचारी, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा इ. मुळे तो दगडागत संवेदनाहीन बधीर अवस्थेत जगत होता. त्याचे जगण्याचे भावविश्व मारल्या गेले होते. त्याच्या कल्पनाशक्तीचा व विचारशक्तीचा खून झाला होता[३] एकाच देशात असलेल्या दोन समूहगटातील एकाच समूहाने दुसऱ्या समूहाला दिलेली ही अमानुष वागणूक मन पिळवटून टाकणारी आहे. येथे अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ होत होता. त्याला बहिष्कृत करण्यात आले होते. हिंदू धर्मशास्त्रानुसार अस्पृश्य हा जन्मजात ब्राह्मणाचा गुलाम असून त्याची सेवा करण्यासाठी विधात्याने त्याला जन्म दिला आहे, असे त्याच्या मनावर बिंबविण्यात आले होते. किती ही वेडगळ शिकवण. अत्यंत अमानुष धर्म दलितांच्या वाट्याला आला होता. या धर्माने त्याच्यावर लादलेले अमानुष अत्याचार भाई माधवराव बागल यांनी सांगितले आहेत. ते लिहितात, अस्पृश्य हे जनावरांपेक्षाही हीन आहेत, त्यांची छाया पडली तरी प्रायश्चित्त घ्यावे असे धर्मग्रंथ सांगते हीन जातीच्या व्यक्तीला उपदेश करू नये. जर एखाद्या ब्राह्मणाने शुद्राला उपदेश केला तर सर्व ब्राह्मणांनी त्या ब्राह्मणावर सामाजिक बहिष्कार टाकावा. त्याने वेदमंत्र उच्चारला तर त्याची जिभ छाटावी आणि जर संपूर्ण वेदमंत्र शिकला तर त्याचे कुऱ्हाडीने तुकडे करावेत. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांच्याबरोबर एका आसनावर बसण्याची, एका शय्येवर झोपण्याची आणि एकाच रस्त्याने चालण्याची इच्छा व्यक्त केली तर त्याला कडक शिक्षा करावी. तापलेल्या सळयांचे डाग अशा शुद्रांच्या कंबरेवर द्यावेत व त्याचे दोन्ही कुल्ले छाटून गावाबाहेर हाकलावे. यज्ञयागात धनधान्याची कमतरता पडली तर शुद्रांची लुटमार करावी.[४] केवढी ही अमानुषता! केवढे हे क्रौर्य? माणुसकीच गिळंकृत करणारी किती निष्ठूर ही व्यवस्था? हजारो वर्षांपासून राजकीय सत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, ज्ञानसत्ता ही अस्पृश्यांच्या शोषणाची हत्यारे सवर्णांच्या हाती आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे दारिद्र्य, अन्याय, छळ, जुलूम इ. सहन करीत अस्पृश्यांना जीवन कंठावे लागले. निसर्गाने मानवाला सहनशीलता दिली; परंतु ही व्यवस्था दलितांच्या सहनशीलतेचा अंत करू पाहते. अस्पृश्य जातीत जन्म मिळाला म्हणून या देशात परकेपणाचे जिणे वाट्याला आले. मग त्या देशाला आपले तरी कसे म्हणावे? हा देश नसून ही बंदिशाळा आहे, कैदखाना आहे असे दलित साहित्यकृतीतील या दलित नायकाला वाटते. मनुने या देशातील दलितांची मनेच मारून टाकली होती. माणसाच्या जन्माबरोबरच त्याला येथे जात मिळाली आणि आजन्म मानसिक छळ, अपमान, अत्याचार त्याच्या वाट्याला आले.

भारतातील वर्ण व्यवस्था एवढी कठोर आहे की, अस्पृश्यांच्या व्यक्तिगत जीवनातील प्रत्येक बाबातीत हस्तक्षेप करणारे नियम या वर्णव्यवस्थेने तयार केले. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या स्वाभाविक व नैसर्गिक गरजाही या वर्णव्यवस्थेत व जातिव्यवस्थेत त्यांना भागवता आल्या नाहीत. या व्यवस्थेचा बळी ठरलेल्या अस्पृश्यांना कधी पुरेसे अन्न मिळाले नाही, कधी अंग भरून वस्त्र मिळाले नाही. निवारा तर गावकुसाबाहेरच कसाबसा मिळायचा. त्याला देवाचे दर्शन घेऊ दिले नाही, सार्वजनिक पाणवठ्यावरून कधी पिण्याचे पाणी नेऊ दिले नाही. दलित हा समाजाचा सेवक, नोकर, दास म्हणून त्याला गावातील मेलेली गुरे ओढावी लागली. सांगावा घेऊन कोसो मैल दूर अनवाणी पायाने जावे लागले. त्याला शिक्षणाची बंदी, धनसंचय करण्याची बंदी, गावात प्रवेश करावयाचा असेल तर त्याच्या कमरेला खराटा (झाडू) आणि गळ्यात मडके बांधून जावे लागले. अशा कित्येक छळांच्या कथा सांगता येतील. दलितांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या या गुलामीचा संबंध कर्मविपाकाशी व त्याच्या पुनर्जन्माशी लावला. पाप-पुण्याचे आदर्श त्याच्यासमोर मांडण्यात आले. एकीकडे पशु-पक्ष्यांना, किड्या-मुंग्यांना जीवदान देणारा हिंदू धर्म मेंदू, इंद्रिय, मन, इच्छा आणि भावना असलेल्या व या राष्ट्राचा मुळनिवासी असलेल्या अस्पृश्य माणसावर ही अत्यंत घातक व जीवघेणी व्यवस्था लादली. भालचंद्र फडके

म्हणतात त्याप्रमाणे, किड्या-मुंग्यांना साखर घालणारा हिंदू धर्म अस्पृश्यांना उपाशी ठेवतो. शिळ्यापाक्या, उष्ट्या, फेकलेल्या तुकड्यावर गुजराण करायला सांगतो. हा अन्याय नव्हे काय?[५] पशु-पक्ष्यांना देव समजून त्यांना घास भरवणारा व त्यांची पूजा करणारा हा हिंदू धर्म जिवंत माणसाला मात्र उद्ध्वस्त करतो, अनंत यातना देतो. निसर्गदत्त अशा सर्व हक्क आणि अधिकारांपासून दूर ठेवतो. जन्मोजन्मी ऐषोरामात आणि विनासायास जगता यावे यासाठी काही धर्मधूरिणांनीही अस्पृश्यांच्या अन्याय, अत्याचाराची व्यवस्था निर्माण केली. या सृष्टीच्या चराचरातील ज्ञानसंचय व विविध अनुभव ग्रहण करणाऱ्या दलितांच्या पंचेद्रियांनाच जणू या व्यवस्थेने कमकुवत व निष्क्रिय केले. या विषम व्यवस्थेचे व दलितांच्या वेदनेचे विवेचन करताना शरणकुमार लिंबाळे लिहितात, हिंदू धर्मव्यवस्थेने दलितांची सावली, स्पर्श आणि वाणी अस्पृश्य ठरवलेली आहे. जन्मजात माणसाला 'अस्पृश्य' व गुन्हेगार लेखलेले आहे. दलितांनी संपत्ती जमा करू नये, त्यांनी गावाबाहेर राहावे, गाढवे व कुत्री ही त्यांची संपत्ती आहे. त्यांना सोन्याचे दागदागिने वापरता येणार नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांनी मातीच्या भांड्यातून अन्न ग्रहण करावे, कपडे म्हणून कफन परिधान करावे. आपली नावे अमंगल व अभद्र ठेवावी असे आदेश हिंदू धर्मग्रंथातून लिहून ठेवले आहेत.[६] माणसाचे जगणे असहाय्य करणारा हा हिंदू धर्म व ही वर्णव्यवस्था केवळ उच्चवर्णीयानांच विशेष अधिकाराच्या संधी देते आणि उर्वरित बहुसंख्य स्वकियांना मात्र विकासाच्या संधीपासून दूर ठेवते. या व्यवस्थेचे वर्णन करताना डॉ. अनंत राऊत लिहितात, ही व्यवस्था फक्त विकास संधीपासून वंचित ठेवूनच थांबत नाही तर असंख्य लोकांचा माणूस म्हणून जगण्याचा नैसर्गिक हक्कच हिरावून घेते. पशुपेक्षाही हीन-दीन जीवन विशिष्ट गटातील माणसांवर लादले. जातीयता, जाती-जातीतील उच्च-नीचता आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रस्थापित समाजव्यवस्थेतील गोष्टी असंख्य लोकांच्या जीवनात कायम वेदना निर्माण करीत असतात.[७] प्रस्थापित समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्थेच्या आधारे दलितांवर अन्याय करणाऱ्यांचा एक वर्ग असतो तर दुसरा तो अन्याय सहन करणाऱ्यांचा वर्ग असतो. या देशातील दलितांवर या वर्णाधीष्ठित व धर्माधीष्ठित शोषणव्यवस्थेने माणसाच्या पिळवणुकीचा, त्याच्या शोषणाचा आणि गुलामीचा पुरस्कार केला आणि असंख्य लोकांचा बळी घेतला. प्रत्यक्ष बाबासाहेब आंबेडकर यांनाही या व्यवस्थेचे असंख्य चटके लहानपणापासूनच बसलेले आहेत. १९३६ मध्ये मुंबई येथे भरलेल्या अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत आपल्या समाजबांधवांना संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दलितांच्या असंख्य वेदना व दुःख मांडले. उंची पोषाख घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. दागदागिना घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पाणी आणण्याकरिता तांब्या-पितळेची भांडी वापरल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. जमीन खरेदी केल्यामुळे जाळपोळ केल्याचे उदाहरण देता येईल. जानवे घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पायात बूट व मोजे घालून गावातून गेल्यामुळे भेटलेल्या स्पृश्य हिंदूस जोहार न घातल्यामुळे, शौचाला जाताना तांब्यात पाणी नेल्यामुळे छळ झाल्याचे उदाहरण देता येईल.[८] याशिवायही पंचाच्या पंक्तीत चपाती वाढल्यामुळे, सरकारी शाळेत मुले घालण्याचा हक्क सांगितल्यामुळे, विहिरीवर पाणी भरण्याचा हक्क सांगितल्यामुळे, वरात घोड्यावरून नेण्याचा हक्क सांगितल्यामुळे अस्पृश्यांना मारहाण करण्यात आली. दलित व्यक्तीने अवमानाचे, अत्याचाराचे आणि अपवित्रतेचे जीवन जगावे अशीच त्यांची मानसिकता बनली आहे. सवर्णांची ही अशी मानसिकता भारतातील हिंदू धर्म आणि संस्कृती यांनी बळकट केली आहे. हिंदू धर्माच्या शोषणाच्या चरकात अन्याय-अत्याचाराने पिळून निघालेल्या बंधू माधव यांच्या कथेतील नामदेव या हिंदू धर्माचा बळी ठरला आहे. हिंदू धर्माचा त्याग करून बुद्धाची गाणी गाणाऱ्या नामदेवाला वर्णवादी गावकऱ्यांनी देवाची गाणी म्हणण्याचा आग्रह धरला आणि त्याने ती म्हणण्यास नकार दिल्याने त्याला बदडून काढण्यात आले. दवाखान्यात दाखल झालेला नामदेव जबानी देताना म्हणतो, तुमच्या हिंदू धर्मानंच मला

मारलं. त्याच धर्माच्या शिकवणीनं माझ्यावर प्रथम वार केला. या गावकऱ्यांनी, आम्हाला अस्पृश्य समजून नरकातील हिन किड्यापेक्षाही हीन समजण्याची या हिंदू धर्माने शिकवण दिली नसती तर गावकऱ्यांची काय बिशाद होती आमच्यावर असा हल्ला करण्याची. बेवारशी जनावराप्रमाणं आम्हाला झोडपून काढण्याची...[९] हिंदू समाजव्यवस्थेने काही जातींना कायमचे अस्पृश्य मानले. त्यांना सबंध समाजजीवनाच्या प्रवाहात सामावून घेतले नाही, त्यांचा वेगळा समूहगट तयार करून या व्यवस्थेने त्यांच्यावर निर्बंध लादले. त्यातून मुक्त होण्याचे सर्व मार्ग बंद केले. त्यांना आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील स्वातंत्र्य दिले नाही. म्हणून या व्यवस्थेच्या विरुद्ध परिवर्तनाचा व क्रांतीचा मार्ग स्वीकारणाऱ्याला नष्ट करण्याची शक्ती या हिंदू धर्माच्या व्यवस्थेत आहे. जगातील इतर कोणत्याही राष्ट्रात मानव प्राण्याची एवढ्या क्रूरपणे अवहेलना करण्यात आली नाही किंवा त्याचे अस्तित्वही नाकारले गेले नाही. एवढ्या निष्ठूर पद्धतीने त्याच्या माणुसकीची हत्या भारताशिवाय अन्यत्र कोणत्याच देशात केली जात नाही. या समाजाच्या वेदना ग्रीकमधील गुलामापेक्षा भिन्न होत्या. विकसनशील युरोपियन समाजापेक्षा भिन्न होत्या आणि श्रमिक जनतेपेक्षाही भिन्न होत्या. विशिष्ट जातीतच जन्माला आलेल्या माणसाला अस्पृश्य का मानायचे? त्याचा विटाळ का मानायचा? त्याला सर्वस्व वंचित का ठेवायचे? माणूस म्हणून जन्माला येऊनही केवळ विशिष्ट जातीमुळे त्याला माणसासारखे जगण्याचा हक्क का नाकारायचा?[१०] असे असंख्य प्रश्न या व्यवस्थेतून उदयाला येतात. या सर्व प्रश्नांचे मूळ भारतातील हिंदू धर्मात व वर्णाधीष्ठित समाजव्यवस्थेत आहे. जगात इतरत्रही काही देशात काही प्रमाणात विषमता असेल नाही असे नाही; पण माणूस या बुध्दीमान प्राण्याची माणसाकडूनच एवढ्या कठोर प्रकारची होणारी विटंबना केवळ भारतातच आढळेल. अमेरिकेतील काळ्यांच्या वाट्याला गुलामगिरी आली; परंतु भारतातील अस्पृश्यता मात्र या काळ्यांच्या गुलामगिरीपेक्षा अत्यंत अमानुष अशी होती. काळे लोक श्वेतांपेक्षा मानव वंशदृष्ट्या वेगळे आहेत. तसे अस्पृश्य नाहीत. गुलामगिरीला धर्माचा आधार नाही अस्पृश्यतेला आहे. हिंदू धर्मग्रंथांनी अस्पृश्यांना नैमित्तिक मानले नाही, तर तिला नित्यत्वाचे रूप दिले. काळे अस्पृश्य नाहीत, श्वेतांना त्यांचा विटाळ होत नव्हता. येथे अस्पृश्यांची सावलीही स्पृश्यावर पडता कामा नये. त्यामुळे सामाजिक न्यायविषयक कल्पना या देशात रुजूच शकल्या नाहीत.[११] सबंध जगाला लाजवणारी आणि माणसाची बुद्धी कुंठित करणारी भारतातील अस्पृश्यता जगातील इतर देशांत अपवादानेच आढळेल. वर्षानुवर्षे अशा प्रकारचा अन्याय-अत्याचार सहन करता करता दलितांच्या हजारो पिढ्या उद्ध्वस्त झाल्या. अशा अन्याय-अत्याचार सोसलेल्या मूक समाजाचा आविष्कार दलित साहित्यातून झाला. रामनाथ चव्हाण यांच्या 'बामणवाडा' या नाटकातील शशीची सासू वारल्यानंतर ब्राह्मणवाड्यातील ब्राह्मण माणसे येत नाहीत. तेव्हा ती आपल्या नवऱ्याला म्हणते, कुणाची वाट पाहता तुम्ही? त्यांच्यापैकी कोणीही परत येणार नाहीत इथ. हे प्रेत तुम्हाल अन् मलाच उचलावं लागेल. जाती-जमातीच्या कोंडवाड्यात कोंडून घेतलेली, माणसांच्या रूपातली जनावरं आहेत ती सारी.... त्यांच्याकडून कसली अपेक्षा करता? तुम्हाला कुणी आपलं म्हणावं, माणूस म्हणून स्वीकारावं अशी अपेक्षा तरी का करता? या देशात जसे जनावरांचे कळप कोंडवाड्यात पोसले जातात.... इथे प्रत्येकाचं अस्तित्व जन्मानं आणि कर्मानं वेगळं आहे. इथला एक वाडा दुसऱ्या वाड्याला कधीच आपलं म्हणत नाही मग स्वीकारणं तर दूरच. कदाचित तुमच्याच काय पण माझ्या प्रेतालासुद्धा खांदा द्यायला वाड्यातील माणसं येतीलच असं नाही.[१२] दलितांचा जन्म आणि मृत्यू या दोन्ही घटना येथील वर्णव्यवस्थेत अत्यंत शूद्र आहेत. म्हणून मृत्यूसारख्या करुण प्रसंगातसुद्धा दलितांच्या वाट्याला आलेली उपेक्षा शशीच्या या संवादातून व्यक्त होते. येथील माणसाचे अस्तित्व जन्माने ठरत असते आणि दलित जातीत जन्म मिळाला की त्याचे सबंध आयुष्य दुःखमय होते. जन्मताच जातीचा शिक्का त्याच्या कपाळी मारला

जातो. या जातिभेदामुळे जन्मापासून मरेपर्यंत आपल्या वाट्याला आलेले नागवेपण व्यक्त करताना त्र्यंबक सकपाळे लिहितात,

नागडा आलो
पण इथेही नागवला गेलो
समाज पुरुषांच्या अहंकाराने
हे संस्कृतीप्रिय देशा!
माझा नागडेपणा तुला कधी झाकताच आला नाही

जन्मभर अन्याय–अत्याचार, अवमान आणि जातीयतेची वेदना सहन करीत जगलेल्या सकपाळेची वेदना अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. दलित साहित्यिकांना या वेदना आविष्कृत करण्यासाठी भूतकाळ अत्यंत महत्त्वाचा वाटतो. हिंदू समाजव्यवस्थेने दलितांना कधीच जवळ केले नाही, आपल्यात सामावून घेतले नाही. दलितांचे देव वेगळे, विहिरी वेगळ्या, मसणवटा, पाणवठा हे सर्व वेगळे. एकूणच सबंध दलित जीवनच उपेक्षित व अवमानित होते. म्हणून दलितांचे साहित्यही त्यांच्या वेगळ्या जीवनातील वेदनेप्रमाणे वेगळे राहणार.

दलित साहित्यातून भूतकाळातील ही चिरवेदना जशी व्यक्त झाली आहे तशीच वर्तमानकाळातील दलितांचे दिवसेंदिवस वाढत चाललेले दुःखही आज दलित साहित्यिक प्रभावीपणे व्यक्त करीत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्यावरील जातीय अन्याय, अत्याचार नष्ट होऊन लोकशाहीमुळे आपल्याला न्याय मिळेल, अशी सर्वसामान्य माणसाची अपेक्षा येथे फोल ठरली आहे. या देशातील जातिभेद, दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार लोकशाहीत कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. त्यातील अनेक अन्याय, अत्याचार करणाऱ्या जातीयवाद्यांना येथील सवर्ण सत्ताधीशांचा मूक पाठिंबा आहे. 'बाटली जुनी पण दारू नवीच' या तत्त्वाप्रमाणे केवळ माणसे बदलली, काळ बदलला पण जातीय शोषणाची प्रथा आजही तेवढीच तीव्र आहे. उलट सवर्ण सत्ताधीशांनी ती अधिक वाढविली आहे. अस्पृश्य समाजातील गुणवंतांच्या गुणांची कदर केली जात नाही. त्यांच्याकडे पाहण्याचा उच्चवर्णीयांचा दृष्टिकोन आजही जातीयवादी व तुच्छ असा आहे. स्वातंत्र्याला अर्धशतक उलटून गेले तरीही आज दलित भयग्रस्त आहेत. ही भयग्रस्तता व नव्या व्यवस्थेतून जन्मलेले हे दुःख दलित साहित्यातून आज व्यक्त होत आहे.

**निष्कर्ष :**

१. भारतातील अस्पृश्यांची वेदना ही जातीय व आर्थिक विषमतेतून निर्माण झाली आहे.
२. दलितांच्या दुःखाला जी वेदना कारणीभूत ठरते, ती या देशातील हिंदू धर्म व मनुस्मृतीने लादलेली आहे.
३. भारतातील अस्पृश्यांप्रमाणे जगातील इतर कोणत्याही देशातील माणसांना एवढी भयावह वेदना सहन करावी लागत नाही.
४. दलित साहित्यातील भूतकाळातील वेदनेप्रमाणेच वर्तमानकाळातही दलितांच्या वाट्याला त्यापेक्षाही भयाण वेदना आलेली दिसते.
५. भारतातील अस्पृश्यांना पशुपेक्षाही हीन पद्धतीने वागविले जाते. म्हणून येथील माणसांच्या वाट्याला भयावह दुःख आणि वेदना आली आहे.

**संदर्भ सूची :**

१. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २०००, पृष्ठ ४४.
२. बाबुराव बागूल, 'जेव्हा मी जात चोरली होती', अक्षर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २००४, पृष्ठ ८२.

३. डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, 'वेदनांचा प्रदेश (मराठवाड्यातील दलित आत्मकथने)', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०००, पृष्ठ २८.
४. (संपा.) शरणकुमार लिंबाळे, 'शतकातील दलित विचार', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००१, पृष्ठ १६९.
५. भालचंद्र फडके, उपरोक्त, पृष्ठ ११४.
६. शरणकुमार लिंबाळे, 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', दिलीपराज प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००४, पृष्ठ १९.
७. डॉ. अनंत राऊत, 'विद्रोहमूल्य', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती २००९, पृष्ठ १६.
८. (संपा.) शरणकुमार लिंबाळे, 'शतकातील दलित विचार', उपरोक्त, पृष्ठे ५९-६०.
९. गंगाधर पानतावणे, 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती, २००१, पृष्ठ १४१.
१०. डॉ. सदा कऱ्हाडे, 'साहित्यविश्लेषण', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९, पृष्ठ ६९.
११. (संपा.) डॉ. मनोहर जाधव, 'साहित्य शोध आणि संवाद', सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०००, पृष्ठ १५८.
१२. रामनाथ चव्हाण, 'बामणवाडा', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथवमावृत्ती १९९१, पृष्ठ ८३.
१३. (संपा.) बी. रंगराव, 'मराठी दलित कविता', साहित्य अकादमी, पहिली आवृत्ती २००४, पृष्ठ २८.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com